प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. २६/०८/२०१८

## देशी बनावटीचे पिस्टलसह दत्तवाडी मधील युवक जेरबंद

पुणे पोलीस आयुक्त मा. व्यंकटेशम सर यांचे आदेशाने आगामी काळात येणारे सण रक्षाबंधन, दहिहंडी व गणेशउसवानिमित्त पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे हददीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करणे व गुन्हांना प्रतिबंध व्हावा म्हणून सर्तकतेने पेट्रोलिंग करण्याचे आदेश दिले असताना, दिं.२५/०८/२०१८ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो. ना. ५६५१ घोटकुले व पो. शि. ८४७० खैरे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, “एक इसम त्याचे कंबरेला एक देशी बनावटीचे पिस्टल खोचुन दत्तवाडी येथील म्हसोबा चौकातील गणपती मंदिराजवळ थांबला आहे. ” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरच्या बातमीनुसार मा. मंगेश शिंदे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-३, मा. बाजीराव मोहिते सहा. पोलीस आयुक्त सो, सिंहगडरोड विभाग पुणे शहर, मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री अनिल डफळ व स्टाफ पो. हवा. ३०३२, तानाजी निकम, पो. ना. ५६५१ सुधीर घोटकुले, पो. ना. ४४९१ गाढवे, पो शि ८४७० रोहन खैरे, पो. शि. ८७१० सागर सुतकर, यांनी दत्तवाडी येथील म्हसोबा चौकाजवळील गणपती मंदिराजवळ सापळा रचुन बातमीत मिळालेल्या वर्णनाचा इसम म्हसोबा चौक येथील गणपती मंदिराजवळ थांबलेला दिसल्याने वरील स्टाफने दिं २५/०८/२०१८ रोजी १७/०० वा. जागीच पकडले. तेव्हा त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **संतोष राजु शेंडगे वय २९ वर्षे धंदा. रिक्षाचालक, रा. घर नं. ४२४, मनपा शाळेजवळ, दतवाडी, पुणे** असे सांगितलेनंतर त्याची अंगझडती घेता त्याचे डावे कमरेला पॅन्टच्या आतमध्ये एक देशी बनावटीचे पिस्टल किं.रू २५,०००/-चे व खिशात दोन जिवंत काडतुस किं.रु २००/- असा एकुण २५,२००/-रू चा माल मिळून आला असुन, त्याचे विरुध्द दत्तवाडी पो. स्टे. येथे भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५) मुं. पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे. पुढील तपास तपास पोलीस नाईक सोमेश्वर यादव हे करीत आहेत.